ISBN978-93-84021-40-5

SHRI DADASAHEB GAWAI CHARITABLE TRUST, AMRAVATI'S

# DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA, AMRAVATI
# TAKSHASHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI &
# RAMKRUSHNA MAHAVIDYALAYA, DARAPUR

JOINTLY ORGANISED

TWO DAY INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE


ON

# THE METAMORPHOSIS OF WOMEN THROUGH EDUCATION

(Challenges Opportunities and Achievements)

8 & 9 January 2016

CELEBRATING




WOMENHOOD

# PROCEEDING

# – अनुक्रमणिका –


| अ.क्र. | नांव | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रा. कु. अंजली बर्डे | भारताच्या विकासात स्त्रियांचे योगदान | १ |
| २. | प्रा. अनिल भिमराव भगत | स्त्रीवादी साहित्याच्या अपेक्षित दिशा | ३ |
| ३. | प्रा. डॉ. भूमिका गो. वानखडे, | विजय तेंडुलकरांच्या नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा | ५ |
| ४. | डॉ. माधुरी भटकर | स्त्रियांच्या मनस्थितीचे विरेचन विधी नाट्य आणि खेळ | ७ |
| ५. | डॉ. डि. एम. मोहोड | स्त्री नेतृत्व आणि राजकारण | ८ |
| ६. | डॉ. सुनिता एस. बाळापुरे | राज्यघटनेतील अधिकार आणि महिला सक्षमीकरण | १० |
| ७. | डॉ. अलका गायकवाड | स्त्रियांचे आत्मभान जागे करणारी स्त्रीवादी कविता | १२ |
| ८. | डॉ. वर्षा एन. चिखले | संत कवयित्रीचा स्त्रीमुक्तीचा विचार | १५ |
| ९. | डॉ. सुनंदा गडकर | ग्रामगीतेतील स्त्री दर्शन | १८ |
| १०. | प्रा.लुंबिनी ह.गणवीर | भारतातील आदिवासींची सद्यस्थिती आणि आदिवासी स्त्रीयांच्या समस्या | २० |
| ११. | प्रा. कविता कोत्तावार | हिंदू स्त्री विषयक कायदे व वास्तविकता | २३ |
| १२. | डॉ. सुलभा खर्चे | आई रिटायर होतेय या नाटकातील स्त्रीदर्शन | २५ |
| १३. | प्रा.कु.लीना शरदराव गावंडे | विषेशता : नामविश्लेषणात्मक दृष्टिकोनातून | २८ |
| १४. | कु. मेघा ज्ञा. तेलखडे | उच्चशिक्षण आणि स्त्रीची सक्षमता | ३० |
| १५. | प्रा. मंदाकिनी मेश्राम | डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकथा, कादंबरीतील स्त्रीविश्व आणि वास्तव | ३२ |
| १६. | प्रा. कु. मंगला मा. कनाटे | आदिवासी परीक्षेत्रातील स्त्रिया आणि शाश्वत विकासाचा प्रश्न | ३३ |
| १७. | प्रा.सुनिता मनवर | नेतृत्व व प्रशासनामध्ये भारतीय महिला | ३५ |
| १८. | डॉ. निशा शेंडे | महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यातुन व्यक्त झालेले स्त्रीजीवन | ३७ |
| १९. | प्रा. पी. एल. अंबोरे | भारतीय स्त्री आणि मानवाधिकार | ३९ |
| २०. | प्रा. कु. निना सा. चवरे | भारतीय स्त्रीयांचे संविधानीक व कायदेशीर अधिकार | ४१ |
| २१. | प्रा.वैशाली तुकाराम लोणे | विषमता : मनोविश्लेषणात्मक दृष्टीकोन | ४४ |
| २२. | प्रा. जी. एच. पांडे | बौध्द धम्म आणि स्त्रियांचा सामाजिक न्याय | ४७ |
| २३. | प्रा.संगीता मंगेश खडसे | महिला सबलीकरण | ४८ |
| २४. | प्रा. मंदा माणिकराव नांदुरकर | आदिवासी स्त्री जागृतीचा लढा | ४९ |
| २५. | प्रा. कु. शामली जा. दिघडे | स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण | ५२ |
| २६. | डॉ. आशा म. धारस्कर | स्त्री, शिक्षण व मानवाधिकार | ५४ |
| २७. | प्रा. कु. लाजवंती आर. टेंभुर्णे | भारतातील स्त्रि उद्योजकापुढिल समस्या व संधी | ५७ |
| २८. | डॉ. अण्णा वैद्य | आंबेडकरी मराठी कवितेतील स्त्री दर्शन | ६० |

- स्वत:च्या पर्यायाने कुटूंब, समाज व देशाच्या विकासाला हातभार लावणे.
- उत्साह जिद्द, चिकाटी निर्माण करणे
- आर्थिक स्वावलंबन
- फावल्या वेळेचा सदुउपयोग
- सामाजिक सर्पक वाढतो.
- निर्णय क्षमता वाढते.
- सर्वांगिन विकास होतो.
- जीवनस्तर उंचावितो.
- स्पर्धेत टिकून राहणे.
- समाजात स्वत:चे स्थान निर्माण होते.
- प्रतिष्ठा, आत्मविश्वास व्यावहारीकता, सामाजिक संपर्क निर्णय क्षमता इत्यादी सुप्त कलागुणांना वाव देणे.

**निष्कर्ष :-**

नोकरी मिळाली नाही म्हणून हताश न होता लघू उद्योग करता येतो. स्वयं रोजगाराला लागणारे भांडवल आपण सहज उपलब्ध करु शकतो. व्यावहारीक ज्ञानात भर पडते. इतर ठिकाणी नोकरी शोधण्याची गरज वाटत नाही उलट इतरांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकतो. मनोधैर्य वाढते. स्व:ताच्या कुटूंबाचा व समाजाचा देखील विकास होतो. समाजाची प्रगती जर घडवून आणायची असेल तर आपल्या देशातील स्त्रियांना व्यावसायिक करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सुची :-**


१) काळेले मीना (२०११) पोषण आणि आहारशास्त्र, प्रकाशन मनोहर पिंपळापूरे, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिकेशर्स, हिंदू मुर्लीचे शाळेजवळ, महाल, नागपूर, ४४०३२ पा.नं. २८५, २८६, २८७

२) Reading Material 30-10-2006 to 11-11-2006
Refresher course in Home-Science.


*************

# स्त्री, शिक्षण व मानवाधिकार


– डॉ. आशा म. धारस्कर
सहाय्यक प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.


२१ व्या शतकाच्या ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाचा, विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा प्रचंड विस्फोट झालेला दिसून येतो. सोबतच गुंतागुंतीचे मानवी संबंध प्रत्येक क्षेत्रात एक जीवघेणी स्पर्धा, अणू युध्दाचा धोका सामाजिक अराजकता, हिंसाचार, भ्रष्टाचार अशा अनेकानेक समस्यांना मानव आजही तोंड देत आहे. परिणामी 'मानवाधिकार' या संकल्पनेला आज अनण्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. सर्व मानवजातीला शांततेने, आनंदाने जगण्याचा अधिकार आहे. भुतकाळात गेल्यास आपणास दिसून येते की, मानवाला अधिकाराबाबत जाणिव होती. वेद, वेदांत वाङ्‌मयात याविषयीची चर्चा झालेली आढळून येते. प्राचीन काळी मानव जेवढा अधिकाराबाबत जागृत होता तेवढाच तो कर्तव्याबाबतही जागृत होता.

**सर्वेजन: 'सुखिनो भवन्तू' !**

ही धारणा पक्की होती. आज मात्र लोकशाही पध्दतीने जीवन जगत असतांना जीवन जगण्याचा स्तर उंचावला डीरपवरीव`ष डर्ळीलपस वाढीस लागले. पण डीरपवरीव`ष डळषश मात्र वेगाने घटत आहे. हे सत्य नाकारुन चालत नाही. त्यामुळे पुन:श्च एकदा भुतकाळाचे स्मरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यातूनच मुल्यांचे संवर्धन होणे शक्य होईल.

'मानवाधिकार' हे एक सार्वभौम मुल्य १९४८ मध्ये मानवाधिकारात्मक घोषणा करण्यात आली. यामध्ये सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता जागतिक स्तरावर निर्माण करणे याला विशेष महत्त्व देण्यात आले. परंतु स्त्रियांच्या दृष्टिकोणानातून विचार करता आज सर्वत्र मानवाधिकाराबाबत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न होत असला तरी चिंतनीय बाब म्हणजे किती स्त्रियांना, मुर्लीना 'मानवाधिकार' हा शब्द

माहित आहे? शालेय विषयात देखील 'मानवाधिकार' या विषयाला पाहिजे त्या प्रमाणात स्थान दिलेले दिसून येत नाही. त्यामुळे 'मानवाधिकार' हा शब्द स्त्रियांसाठी केवळ स्वप्नवत ठरतो.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'भारत देश झोपड्या-झोपड्यांमधुन वसला आहे. पण या खेड्यातील स्त्रियांची अवस्था काय आहे? घरचे दारिद्रय, अज्ञान यामुळे भारतीय स्त्री इतकी पिचली गेली की, स्वतःचे काही अधिकार असू शकतात याची तिला जाणिवही नाही. आज सर्वत्र विरोधाभासात्मक परिस्थिती निर्माण झालेली दिसून येते.

स्त्रियांसाठी अनेक कायदे झालेत. पण समाजावर त्याचा परिणाम झाला का? समाजाची मानसिकता बदलली काय? समाजाची मानसिकता बदलावयाची असेल तर शालेय स्तरापासूनच मुर्लींवर शिक्षणातून संस्कार होणे महत्त्वाचे ठरते. कारण शिक्षण हे संस्कार संक्रमणाचे साधन आहे. मानवाधिकारात्मक शिक्षणाचा विचार हा मूल्यांना सोडून करता येणार नाही. कारण आज मानव आपल्यातील मानवत्वच हरवून बसला आहे. समाजात वाढलेला हिंसाचार, भ्रष्टाचार, धर्मवेड, अनैतिकता, सांप्रदायिकता याने भारतीय मूल्यांचा ऱ्हास होतो आहे. केवळ भारतातच नव्हे तर आज जागतिक स्तरावर ही समस्या भेडसावत आहे.

मूल्यसंकल्पना ही समाजातील प्रत्येक मानवाचे जीवन व्यापणारी संकल्पना आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून मानवाधिकारात्मक मुल्यांचे संस्कार स्त्रीयांवर, मुर्लीवर करावे लागतील. प्रौढ शिक्षण निरंतर शिक्षण, अनौपचारिक शिक्षण अशा विविधांगी शिक्षणाचा अवलंब यासाठी करता येईल.


मानवाधिकार शिक्षणातून मानवाधिकारात्मक वृत्ती, सहनशीलता, आदर एकात्मता, सर्वधर्म-समभाव, सद्भावना या गुणांचा विकास स्त्रिया व मुर्लींच्या ठिकाणी करावी लागेल. स्वतःच्या अधिकाराबाबत स्त्री जेवढी जागृत तेवढीच ती इतरांच्या अधिकाराबाबत जागरुक हवी. एवढेच नव्हे तर अधिकार व कर्तव्याची समन्वयाची जाणिव प्रत्येक स्त्रिला असायला हवी. त्यादृष्टीने स्त्रियांना शिक्षण देणे गरजेचे आहे.

पण हे शिक्षण कोणते असावे? कसे असावे? याचा विचार केल्यास आज मानवी संबंधातील गुंतागुंत सोडविणारे शिक्षण गरजेचे आहे. व या शिक्षणाचा गाभा मानवाधिकारात्मक' मुल्य हा असावा.

युनोने म्हटले आहे, मघपुेूॅी ठळसहींीफ पण हे ठळसहींी समजण्यासाठी संपूर्ण शिक्षणप्रणालीच मानवाधिकार शिक्षण या कल्पनेने व्यापून जावी. ही व्यापकता आणन्यासाठी आपल्याला त्रेंीी झळश्रश्रशीीॅ ष एर्वीलरींळेप या संकल्पनेचा आधार घेता येईल.

µ Learning to Know
* Learning to Do
* Learning to Be
* Learning to Live Together

Learning to Know :- एक स्त्री म्हणून मला कोणकोणते अधिकार आहेत हे कळल्याशिवाय कोणतीही स्त्री ही योग्य कृती करु शकणार नाही.




✲ Learning to Be :- स्त्रियांमध्ये मानवीय गुणांची प्रामुख्याने क्रियात्मक, भावनात्मक, सौदर्यात्मक, नैतिक, आध्यात्मिक मुल्यांची जोपासना अभिप्रेत आहे. ह्या मुल्यांचे संवर्धन शिक्षणाने स्त्रियां, मुर्लींमध्ये होणे आवश्यक आहे.

✲ Learning to Live Together :- स्त्रियांच्या अंगी एक संघर्षविरहीत, सहनशील सहजीवन जगण्याची पात्रता यावयास हवी मानवाधिकार हे स्वतंत्र व सार्वभौम मूल्य मानून त्याचे अधिष्ठान स्त्रि शिक्षणाला यायला हवे.

राष्ट्रात, जगात शांतता निर्माण करणारी पिढी निर्माण करावयाची असेल, जगात शांतता, सुव्यवस्था, सामाजिक न्याय, समता स्थापन करावयाची असेल तर मानवाधिकाराचे शिक्षण स्त्रियांना देणे अनिवार्य ठरते. Learning to Live Together हा शिक्षणाचा उच्च स्तर असेल. व ह्या स्तराचा मुख्य उद्देश आहे. To develop the Positive attitude towards philosophy of co-existence सह अस्तित्वाच्या स्विकार करण्याच्या मानसिकतेला विकसित करणे.

जस्टीस शहा यांच्या मते, 'How to co-exist not only with human bodies, But all living beings on the earth may be animals vegetion and invironmaent including air and water' याचाच अर्थ व्यक्तिचा (स्त्री-पुरुष) दृष्टीकोन सार्वभौम बनवायचा आहे. स्त्रि शिक्षणात मुल्य विकास घडवून आणण्यासाठी सार्वभौम मूल्यांचे अर्था Universal Values चे पंचशील तत्त्व अमंलात आणने गरजेचे आहे.

हे पंचशील तत्त्व म्हणजे : १) सत्य (Truth)

२) धर्म (Rightous Conduct)


३) शांती (Peaue)

४) प्रेम (Love)

५) अहिंसा (Non-Violende)

स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया हा वरील पंचशील तत्त्वांवर आधारित असावा व त्यावर बांधली जाणारी इमारत ही नवनविन विचारांनी प्रेरीत, नवनविन विचारप्रवाहांना स्विकारणारी हवी. मात्र सद्य:स्थितीचा विचार करता असे लक्षांत येते की, आजही स्त्री ही अतृप्त, अशांत व दुर्लक्षितच आहे. आधुनिक विज्ञानाने स्त्रीच अनेक क्षेत्रातील दर्जा उंचावून दिला. तिला मुक्त संचार करण्याची मुभा दिली. पण ही स्त्री आज 'पुरुषाळलेपणा' करुन ह्या भोगवादाचा बळी ठरु पाहात आहे, ही खेदाची बाब आहे. आधुनिकीकरण तिने जरुर स्वीकारावे कारण ती काळाची गरज आहे. पण आपल्या स्त्रीत्वाचा मंजुळ ध्वनीही तिने विसरु नये. कारण पुरुषाळलेपणा हा स्त्रीत्वाचा गुण विसरायला लावतो. त्यावर उपाय एकच आहे, स्त्रीने आपल्या प्रगतीसाठी आधुनिक व वेदांतीक ह्या दोन्ही मार्गाचा समसमान मेळ घालावा. सोने तेच पण अलंकार नवीन, असे तिचे मोहक रुप असावे. आधुनिक विचार सरणीसोबत मानसीक उन्नयन, सुसंस्कृतपणा महत्त्वाचा आहे. आधुनिक विज्ञानाने स्त्रिला स्वच्छंद केले. स्वतंत्र केले. जगाचा उपयोग करायला शिकविले पण त्याचा परिणाम काय झाला? आजच्या समाजाचे जे भिषण दृश्य दिसते, ते याचे द्योतक आहे. आणि म्हणून आज पुन्हा आदर्शावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. आपण पूर्णत्वाप्रत कसे पोहचू यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. म्हणूनच पूर्णत्वाप्रत पोहचण्याकरिता आत्मिक स्तरावर स्त्रीयांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी तिला आपल्या हक्कांची अधिकारांची जाण हवी. विज्ञानाची प्रगती थोपवीने अशक्य आहे, त्याचप्रमाणे हजारो वर्षे मागे जाणेही अशक्य आहे. यातून मधला मार्ग काढायचा आहे. तो मार्ग असा, की सनातन मुल्यांचा पाठपुरावाकरीत, विज्ञानाला हाताशी धरुन या नवीन शतकाची वाटचाल करायला हवी व त्याकरीता शिक्षणाचीच मदत घ्यावी लागेल.

शिक्षण घेणे हा मूलभूत मानवी हक्क आहे. स्वत्वाची, अस्मितेची जाणीव ही शिक्षणानेच माणसाला होत असते. आज विज्ञानयुगात नव्हे, तंत्रज्ञान युगात जर भारताला भरारी मारायची असेल, तर स्त्री शिक्षणाची गुंतवणूक करावी लागेल. पण आजच्या स्त्री-शिक्षणातून स्त्रियांचे अंगी नवीन सहस्त्रकात तग धरण्याची क्षमता त्यांच्या अंगी निर्माण होत नाही. ही क्षमता विकसीत व्हावयाची असेल तर 'सर्वकष व्यक्तिमत्त्व विकास' हेच शिक्षणाचे ध्येय ठेवावे लागेल व त्याकरीता सर्वंकष शिक्षण (Integrated Education) ची योजना आखावी लागेल. खर्पींशसीरींशव एर्वीलरींळेप म्हणजे तेच शिक्षण ज्यात व्यक्ती घपुेश्रशवसश चरींशी गश थळीवो चरींशी बनते.




अशा शिक्षणाचा आकृतीबंध नव्याने तयार करण्यात यावा व तो सक्तीचा करण्यात यावा. ह्या शिक्षणाला वयाचे बंधन तर नकोच, पण वयोगटाला अनूसरुन तो अभ्यासक्रम असावा ज्यातून स्त्रीयांमध्ये विविध कौशल्य क्षमता, पात्रता निर्माण होवू शकेल आणि ही बाब जर प्रत्येक स्तरावर झाली, तर स्त्रियांना लहानपणापासूनच सक्षमतेचे बाळकडू मिळेल व सबलतेचे संस्कार लहानपणापासूनच तिला मिळतील.

शिवाय आपला आदर्श कायम ठेवून आधुनिकतेने स्त्री ह्या आधुनिक जगात सहज व्यवहार करु शकेल. नव्याजुन्याचा मेळ घालता आला पाहिजे.

किरण बेदी यांना मॅगॅसेसे अवार्ड मिळाला. त्यांच्या व्यक्तीमत्वात प्रकर्षाने जाणवते ती संवेदनशीलता, व्यापकता व सर्वसमावेशकता. त्यांच्या कार्यात अडथळे निर्माण करणारे लोक नव्हते असे नाही. पण कुठल्याही त्रासाला न जुमानता त्यांनी आपले कार्य सुरु ठेवले. मानवातल्या मुलभूत पावित्र्यावर त्याच्या स्वरुपभुत ईश्वर तत्वावर विश्वास ठेवून त्या कार्य करतांना कैद्यांना योगवेदांत व सार्वजनिक धर्मतत्वाची शिकवण देवून त्यांच्यात आत्मविश्वास जागृत करणे, त्यांना प्रेम, सहानुभुती देवून त्यांचे राहणीमान उंचावून त्यांना स्वत:चे हृदय विकसित करण्यात मदत करणे वगैरे उपक्रम त्यांनी तुरुंगात राबविले. हे खरे स्त्रीत्व आहे. मुळातच स्त्रीत्व हा भाव आहे, हे तत्व आहे. प्रत्येक व्यक्तीत ते असण्याची आवश्यकता आहे. पण आज ही गोष्ट दुर्लक्षित होत आहे. आणि म्हणूनच स्त्री-पुरुष समानता, स्त्री मुक्ती ह्या उदात्त संकल्पनांचा विपर्यास होतो.

'स्त्री सबलीकरण' ह्या परिभाषेचे, संकल्पेनेचे संक्रमण समाजाच्या प्रत्येक स्तारपर्यंत जायला हवे. स्त्री सक्षम आहे, स्त्री सबल आहे. ह्या जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. ही मानसिकता निर्माण करण्यची आवश्यकता आहे. समानता, स्वातंत्र्य, सन्मान, स्वधर्म, स्वनिर्णय याबाबत तिला जागृत करावयात हवे. हिच खरी मानवाधिकार विषयक जाणिव जागृती ठरेल. संविधानातील प्रत्येक बार्बीविषयी स्त्री जागृत होऊ शकेल म्हणून स्त्रीयांकरीता मानवाधिकाराचे शिक्षण सक्तीचे करणे ही आधुनिक काळाची गरज निर्माण झालेली आहे.

***************

# भारतातील स्त्रि उद्योजकापुढिल समस्या व संधी

प्रा. कु. लाजवंती आर. टेंभुर्णे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी ,जि. अमरावती

भारतातील उद्योजकता चळवळीचा प्रारंभ हा स्वातंत्र्योत्तर काळात झाला. ती एक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. ही संकल्पना व्यापक असून ती उद्योजकाने करावयाचे एक कार्य आहे. पुरूष आणि स्त्री हे दोघेही समाजव्यवस्थेचे घटक आहे आणि तरिही समाजात पुरूषप्रधान व्यवस्था असल्यामुळे पुरूषांना अमर्यादित बंधनात अडकविल्या गेले.

स्त्री हि शक्ती आहे असे जरी म्हटल्या जात असले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तीचा अजिबात संबंध असलेला दिसून येत नाही. ती म्हणजे उपभोगाची वस्तू, 'चूल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा फुले , धोंडे केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नांनी स्त्रियांना वेगळे स्थान प्राप्त करून दिले. भारतात ५० % लोकसंख्या हि स्त्रियांची आहे. देशात स्वातंत्र्य प्राप्ती नंतर अनेक बदल घडुन आले. सामाजिक सुधारणा झाल्या परंतु हा अर्धविकास होय. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, '' कोणत्याही देशाचा आर्थिक विकास किती झाला आहे हे जर बघावयाचे असेल तर तेथिल स्त्रियांचा विकास बघावा म्हणजे स्त्रियांच्या विकासावरून त्या देशातील आर्थिक विकास दिसून येतो. म्हणुनच आज स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण केले आहे. स्त्रियांसाठी प्रतिबंधीत असे क्षेत्र तिने आज काबीज केले आहे. उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये तिने आपला ठसा उमटविला आहे. उद्योजकतेद्वारे महिलांचा विकास म्हणजे देशाचा विकास होय. म्हणूनच औद्योगिक क्षेत्राचा विकास, आर्थिक क्षेत्राचा विकास व वृध्दी करण्यासाठी महिला उद्योजकांना संधी देणे आवश्यक ठरते. म्हणूनच स्त्री उद्योजक म्हणजे काय ? हे पाहणे आवश्यक ठरते तिची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. तरीही

सामान्यपणे '' स्त्री उद्योजक म्हणजे अशी स्त्री की जी एखाद्या उद्योगाची स्थापना करते, त्याचे संचालन करते किंवा त्या उद्योगाच्या यशस्वीते करिता काही कार्य पार पाडते''

अशा ग्रा स्त्रि उद्योजकाचे काही भागामध्ये वर्गीकरण करता येते.

१) संघटीत व असंघटीत क्षेत्रातील स्त्री उद्योजक
२) परंपरागत व आधुनिक संस्थातील स्त्री उद्योजक
३) शहरी व ग्रामीण भागातील स्त्री उद्योजक
४) मोठ्या व लहान उद्योगातील स्त्री उद्योजक
५) एकरी व समुहातील स्त्री उद्योजक

भारतीय स्त्रि उद्योजक ही तीन भागामध्ये सराव करतांना दिसून येतो.

१) पहिल्या भागातील स्त्री उद्योजक
अ) मोठ्या शहरामध्ये स्थापित असलेली